**दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, गंगाखेड, जि. परभणी यांच्या न्यायालयात.**

**अंगद नामदेव दणदणे**

**विरुध्द**

**तहसीलदार व ईतर**

**नि.क्र.२२ वरील आदेश.**

**( पारीत दिनांक १९.०६.२०२५ )**

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे नि.क्र.५ वरील आदेश होईपर्यंत वाद मिळकतीची परिस्थिती जैसे थे ठेवण्याचा आदेश पारीत करण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. वादीतर्फे असे नमुद करण्यात आले आहे की, वादीच्या वडिलांनी त्यांच्या हयातीत वाद मिळकत ही वादीस वाटपाद्वारे दिलेली आहे. तरी देखील तहसीलदार यांनी बेकायदेशीर आदेश पारीत करुन ०१ आर क्षेत्र जोशी समाजातील मयत व्यक्तीचे अंत्यविधी पार पाडण्याकरीता स्मशानभुमीसाठी अशी नोंद ईतर अधिकारात फेरफार क्र.७१५ द्वारे घाईगडबडीने घेतलेली आहे. त्या आदेशाद्वारे प्रतिवादी हे वादीच्या जमीनीचा कब्जा घेवू पाहत आहेत. जर जैसे थे आदेश पारीत करण्यात आला नाही, तर वादीचा दावा दाखल करण्याचा उद्देश संपुष्टात येईल.

**०२–** प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. ए.ए. सावंत व श्री. एस.एस. मुंढे यांनी असे नमुद केले की, त्यांना आणखी माहीती घ्यावयाची आहे. वादीच्या वडिलांनी २०११ मध्ये ०१ आर क्षेत्र जोशी समाजाच्या स्मशानभुमीसाठी दानपत्राद्वारे दिलेली आहे व त्या ठिकाणी २०११ पासून जोशी समाज अंत्यविधी करीत आहे. जर आज रोजी जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश पारीत झाला, तर निश्चितपणे त्याचा गैरफायदा घेवून जोशी समाजाच्या व्यक्तीच्या अंत्यविधीस हरकत अडथळे करतील व त्यामूळे दोन्ही समाजांमध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by
YADAV GAJANAN
BHANUDAS
Date: 2025.06.19
17:52:50 +0530

**०३–** अभिलेखावरुन असे स्पष्ट होत आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा तहसीलदार यांनी दिनांक ०२.०६.२०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशा विरोधात दाखल केलेला आहे. तसेच, त्यामध्ये मनाई हुकूमाची देखील मागणी केलेली आहे. दावा दाखल झाल्यानंतर समन्स काढण्यात आले असता प्रतिवादी क्र.१ ते ३, ६, ११, १२, १५, १६ व १८ हे न्यायालयात वकीलांमार्फत हजर झाले, मात्र त्यांनी वादोत्तर/कैफीयत दाखल केली नाही. याव्यतीरीक्त ईतर प्रतिवादींना पुन्हा समन्स काढण्यासाठी वादीने अर्ज दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असे स्पष्ट होत आहे की, दिनांक ०२.०६.२०२५ रोजी तहसीलदार यांनी आदेश पारीत केल्यानंतर दिनांक ०९.०६.२०२५ रोजी फेरफार क्र.७१५ मंजुर केलेला आहे. त्याद्वारे वादीस अशी भिती आहे मी, प्रतिवादी हे घाईगडबडीने त्यास बेदखल करण्याच्या तयारीत आहेत. त्याकरीता वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०४–** सध्याची परिस्थिती पाहता, उभयपक्षांना मान्य असेल अशी परिस्थिती दर्शविणारा कोणताही दस्त अभिलेखावर नाही. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वाद मिळकतीवर जोशी समाजाची स्मशानभुमी आहे व ती जागा वादीच्या वडिलांनी दानपत्राद्वारे दिलेली आहे. त्याच्या विपरीत वादीचे असे कथन आहे की, ती जागा वादीच्या वडिलांनी वादीला वाटपाद्वारे दिलेली आहे व त्या ठिकाणी कोणतीही स्मशानभुमी नाही. जोपर्यंत उभयपक्षांचे वाद कथन अभिलेखावर येत नाहीत, तोपर्यंत अंतरीम मनाई हुकूमाच्या अर्जावर आदेश पारीत करता येणार नाही. मात्र त्याच वेळेस न्यायालयासमक्ष असलेल्या दोन्ही पक्षांचा विचार करणे आवश्यक आहे. युक्तिवादादरम्यान वादीतर्फे विधिज्ञ श्री. के.ए. टेंगसे यांनी संमती दर्शविली की, नि.क्र.०५ वरील आदेश होईपर्यंत दरम्यानच्या काळात जर एखादा जोशी समाजाचा व्यक्ती मरण पावला तर वाद मिळकतीवर अंत्यविधी करण्यास माणूसकीच्या दृष्टीने ते विरोध करणार नाहीत. मात्र त्याचा अर्थ ती जागा स्मशानभुमीची आहे असा

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by
YADAV GAJANAN
BHANUDAS
Date: 2025.06.19
17:53:23 +0530

काढण्यात येऊ नये. त्यांनी फक्त अपेक्षा बाळगली की, ज्या घाईगडबडीने प्रतिवादींनी फेरफार क्र.७१५ मंजुर करुन घेतला, त्याच गडबडीने त्यांनी वाद मिळकतीचा ताबा घेऊ नये व त्यावर वादीच्या कब्जात हरकत अडथळे करु नयेत. प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एस.एस. मुंढे यांनी देखील होकार दर्शवत संमती दर्शविली व नमुद केले की, पुढील तारखेस ते त्यांचे म्हणणे सादर करतील व त्यादरम्यान जर एखादा जोशी समाजाचा व्यक्ती मयत झाला, तर वाद मिळकतीवर ते त्यांचे अंत्यविधी करतील. मात्र त्या जागेवर कब्जा करणार नाहीत, कायमस्वरुपात कोणतेही बांधकाम करणार नाहीत. त्यांनी देखील नमुद केले की, याचा अर्थ असा काढण्यात येऊ नये की, त्या ठिकाणी स्मशानभुमी नव्हती व प्रतिवादींनी त्यांचे हक्क सोडून दिले आहेत. वादी व प्रतिवादींतर्फे करण्यात आलेल्या विधानाद्वारे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१– प्रतिवादींचे म्हणणे दाखल होईपर्यंत उभयपक्षांनी वाद मिळकतीची परिस्थिती जैसे थे ठेवावी.

२– दरम्यानच्या काळात जर जोशी समाजाचा एखादा व्यक्ती मरण पावल्यास वाद मिळकतीवर अंत्यविधी करण्यास वादीने हरकत अडथळे करु नयेत. तसेच, त्या जागेवर प्रतिवादी यांनी कोणताही कब्जा करु नये किंवा कायमस्वरुपीचे बांधकाम करु नये.

३– हा आदेश तात्पुरत्या स्वरुपाचा आहे. या आदेशाद्वारे उभयपक्ष कोणतेही हक्क व अधिकार सांगणार नाहीत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.06.19 17:53:37 +0530

**दिनांकः–** १९.०६.२०२४

**( गजानन भा. यादव ),**
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, गंगाखेड.